दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com
वर्ष : ०५ | अंक : ९८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२१ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056







# पोलीस आणि दहशतवादी यांच्यात चकमक, २ दहशतवाद्यांना अटक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, चंदिगढ :** पंजाबच्या लुधियाना येथून मोठी बातमी समोर येत आहे. लुधियाना येथे पोलीस आणि दहशतावादी यांच्यात चकमक झाली आहे. दिल्ली-अमृतसर राष्ट्रीय महामार्गावर लाडोवाल टोल प्लाजाजवळ ही चकमकीची घटना घडली आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी एक दिवसआधीच अतिरेक्यांना हँड ग्रँनेडसोबत पकडले होते. या अतिरेक्यांची चौकशी केली असता इतर अतिरेक्यांची माहिती मिळाली होती.



त्यानंतर पोलिसांकडून अतिरेक्यांना पकडण्यासाठी आज सापळा रचण्यात आला होता. अतिरेकी संबंधित मार्गाहून जाणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पण अतिरेकी तिथून जात असताना त्यांनी थेट पोलिसांवर गोळीबार सुरु केला. त्यानंतर पोलिसांनी त्या गोळीबाराला प्रत्युत्तर दिलं. या गोळीबारात पोलिसांची गोळी लागल्याने दोन अतिरेकी जखमी झाल्याची माहिती आहे.

लुधियानाचे पोलीस आयुक्त स्वप्न शर्मा यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही आधी टेटर मॉड्यूलचा भंडाफोड केला आणि तीन आरोपींना पकडलं. त्यानंतर आम्हाला आज बब्बर खालसा इंटरनॅशनल (बीकेआय) संघटनेच्या अतिरेक्यांची माहिती आम्हाला मिळाली होती. हे आरेपी खडअ च्या सांगण्यानुसार काम करत होते. आम्ही घेराबंदी केली आणि चकमकीनंतर दोन संशयित आरोपी गंभीर स्वरुपात जखमी झाले आहेत, अशी माहिती पोलीस आयुक्तांनी दिली आहे.

दरम्यान, चकमक झालेल्या परिसराता आला पोलीस छावणीचे स्वरुप आले आहे. पोलीस आता सखोल तपास करत आहेत. या प्रकरणात पोलिसांकडून सविस्तर माहिती गोळा केली जात आहे. आरोपींचा मोठा घातपात घडवण्याचा कट होता, अशी चर्चा आहे. या घटनेनंतर आता पोलीस अलर्टवर आहेत. ठिक-ठिकाणी चेकिंग केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांचे साथीदार हरियाणा आणि अन्य ठिकाणी होते. पोलिसांनी त्यांना सुद्धा ताब्यात घेतल्याची माहिती मिळत आहे. हे दहशतवादी वेगवेगळ्या ठिकाणी ग्रेनेड हल्ले करण्याच्या तयारीत होते. त्यांच्याकडून पिस्तूल, हँड ग्रेनेड पोलिसांनी जप्त केले आहेत. तसेच पोलिसांना दहशतावाद्यांकडे ५० पिस्तूलीच्या गोळ्या मिळाल्या आहेत. त्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत. आरोपींचे साथीदार इतर राज्यांमधूनदेखील पकडले गेले आहेत. त्यामुळे या दहशतवाद्यांना अडवण्यात पंजाब पोलिसांना मोठं यश आल्याचं मानलं जात आहे.

## शिरवाडे प्राथमिक शाळेत शिक्षक टंचाई; पालकांचा तीव्र इशारा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** शिरवाडे वाकद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षकांच्या तुटवड्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असून, मंजूर पदे तातडीने न भरल्यास शाळेला कुलूप लावण्याचा इशारा संतप्त पालकांनी शिक्षण विभागाला दिला आहे.

या शाळेला एकूण सात पदे मंजूर आहेतचार उपशिक्षक, दोन पदवीधर शिक्षक आणि एक मुख्याध्यापक. मात्र प्रत्यक्षात फक्त तीनच शिक्षक संपूर्ण सात वर्गांचा कारभार सांभाळत आहेत.

इयत्ता १ ते ५ मध्ये १९७ विद्यार्थी असून चार पटाधारी शिक्षक आवश्यक आहेत; पण केवळ तीनच शिक्षक कार्यरत असल्याने वर्गशिक्षणावर गंभीर परिणाम होत आहे.

इयत्ता ५वी व ६वीसाठी एकूण ५८ विद्यार्थी असून दोन पदवीधर शिक्षकांची आवश्यकता आहे. परंतु सन २०१९ पासून भाषा पदवीधर शिक्षकच नाही, तर गणित शिक्षक देखील मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त भार सांभाळत होते. त्यांची बदली झाल्यानंतर आता दोन्ही पदे रिक्त आहेत. काही दिवसांपूर्वी नेमलेले मुख्याध्यापकही फक्त आठ दिवसांत बदली करून गेल्याने समस्या अधिकच तीव्र झाली आहे.

याशिवाय शाळेतील तब्बल १८ विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नसल्याने त्यांची सरकारी पोर्टलवर नोंद होत नाही. त्यामुळे हे विद्यार्थी 'बोगस' म्हणून दिसत असल्याने प्रत्यक्ष विद्यार्थीसंख्या कमी दाखवली जात आहे आणि परिणामी शिक्षकपदांमध्ये अधिक कपात होत आहे.

शिक्षकांची संख्या अपुरी असल्याने नियमित शिक्षण, उपक्रम, मूल्यमापन आणि शिकवणीची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात घसरत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान रोखण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरण्याची पालकांची मागणी असून, दुर्लक्ष झाल्यास शाळेला कुलूप लावण्याचा निर्णय घेण्याशिवाय पर्याय नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

## रस्त्यावरचा कचरा उचलून घनकचरा विभागाच्या कार्यालयात टाकून आंदोलन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, दिवा (ठाणे) :** दिवा विभागात गेल्या ८ ते १० दिवसांपासून कचरा उचलण्याचे काम ठप्प असल्यामुळे संपूर्ण परिसरात कचऱ्याचे प्रचंड ढीग साचले आहेत. परिणामी रस्त्यांवरून जाणेही नागरिकांसाठी अत्यंत किळसवाणे झाले असून दुर्गंधीमुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासनाच्या घनकचरा विभागाकडून जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसत आहे.



या निष्काळजी प्रशासनाचा निषेध म्हणून दिनांक २०.११.२०२५ रोजी दुपारी १:०० वाजता भारतीय जनता पार्टी ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष विजय अनंत भोईर, दिवा-शील मंडळ अध्यक्ष सचिन रमेश भोईर, महिला मोर्चा अध्यक्षा सपना भगत, रोशन भगत, प्रवीण पाटील, नितीन कोरगावकर, साधना सिंह, पुनम सिंह, अनुराग पाटील, विजय वाघ, कल्पेश सारस्वत, तसेच भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मिळून दिवा विभागातील कचरा स्वतः गोळा करून तो थेट घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कार्यालयासमोर टाकून तीव्र निदर्शने केली.

पालिका प्रशासनाने तात्काळ कचरा उचलण्याची कार्यवाही सुरू न केल्यास अधिक आक्रमक आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

## रामबाग मैदान क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी आरक्षित ठेवा : आ. किशोर जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील ऐतिहासिक व मध्यवर्ती भागात असलेल्या रामबाग मैदानावर जिल्हा परिषद प्रशासनाची नवीन इमारत बांधण्याला नागरिकांचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे नागरिकांपासून क्रीडाप्रेमींपर्यंत सर्व स्तरातून येणाऱ्या तीव्र विरोधाच्या पार्श्वभूमीवर आ. किशोर जोरगेवार यांनी बुधवारी मुंबई मंत्रालय येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन हे मैदान कायमस्वरूपी क्रीडा प्रशिक्षण केंद्र आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी आरक्षित करण्याची मागणी केली.

यावेळी मुख्यमंत्री यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. रामबाग मैदान हे चंद्रपूर शहराचे फुफ्फुस मानले जाते. सुमारे सात एकर क्षेत्रफळाचा हा परिसर दररोज हजारो नागरिकांच्या व्यायाम, चालणे, योग, धावणे, विविध खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी वापरला जातो. याठिकाणी जिल्हा परिषदेची इमारत उभारण्याचा प्रस्ताव जाहीर झाल्यापासून नागरिकांमध्ये असंतोष पसरला होता. आंदोलनानंतर जिल्हा परिषद इमारतीसाठी खोदलेला खड्डाही बुजविण्यात आला; मात्र पर्यायी जागेबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने संभ्रम निर्माण झाला होता.



या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आ. जोरगेवार यांनी बुधवारी मुंबई मंत्रालयात मुख्यमंत्र्यांची भेट घेत, रामबाग मैदानावर कोणतीही प्रशासकीय इमारत न बांधता हे मैदान नागरिकांसाठी जतन करण्याची मागणी केली. रामबाग मैदान केवळ एक रिकामी जागा नाही, तर हजारो नागरिकांचा श्वास आहे. इथे सकाळपासून रात्रीपर्यंत क्रीडा, व्यायाम, कार्यक्रम आणि सामाजिक संवाद चालत असतो. हे मैदान पिढ्या न पिढ्या नागरिकांनी जपले आहे. त्यामुळे याठिकाणी इमारत उभारणे अव्यवहार्य असून नागरिकांच्या भावनांचा अनादर करणारे ठरेल, असे यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले. नागरिकांनीही मैदान जपण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दर्शविला आहे. स्थानिक रहिवासी, क्रीडाप्रेमी, सामाजिक संस्था आणि सांस्कृतिक मंडळांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे ही मागणी अधिक तीव्र झाली आहे.

रामबाग मैदानाचे संवर्धन आणि संरक्षण हे शहराच्या आरोग्य, खेळ संस्कृती आणि सामाजिक जीवनासाठी अत्यंत आवश्यक असल्याने शासनाने नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन सकारात्मक निर्णय द्यावा, अशी मागणी यावेळी त्यांनी केली आहे. या संदर्भात त्यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली आहे.

## २३ नोव्हेंबरला संडे मार्केट राहणार बंद




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** येत्या २३ नोव्हेंबर रोजी संडे मार्केट भरणाऱ्या परिसरातील विविध शाळांमध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ होणार असल्याने दर रविवारला भरणारे संडे मार्केट या दिवशी बंद ठेवण्यात येणार असुन सदर निर्देशाची सर्व व्यावसायिकांनी नोंद घेण्याचे आवाहन चंद्रपूर मनपा प्रशासनाने केले आहे. मनपा हद्दीतील जयंत टॉकीज चौक ते खिश्चन कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत दर रविवार ला संडे मार्केट या नांवाने बाजार भरत असून, त्यांत विविध तात्पुरत्या स्वरुपाची दुकाने, हातठेले, फेरीवाल्यांची दुकाने लावण्यांत येत असतात.

येत्या रविवारी दिनांक २३ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ (महाटीईटी) होणार आहे. सदर परीक्षेची केंद्रे या परिसरातील न्यु इंग्लीश हायस्कुल, ज्युबली हायस्कुल व मराठी सिटी/हिंदी सिटी हायस्कुल येथे देण्यात आली असल्याने येथे मोठया प्रमाणात विद्यार्थी येणार आहे. तसेच सदरील परिसरात नागरिकांची प्रचंड गर्दी असण्याची शक्यता असतांना संडे मार्केट मधील गर्दीमुळे काही दुर्घटना होण्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही. त्यामुळे सदर ठिकाणी दर रविवारला भरणारे संडे मार्केट बंद ठेवण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

## माथेरानमध्ये अमावस्येची रात्र भयभीत करणारी! स्मशानभूमीत अघोरी पूजेचे अवशेष

**दि.२०, रायगड :** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शांत असलेल्या माथेरानमध्ये बुधवारी (१९ नोव्हेंबर २०२५) अमावास्येच्या रात्री घडलेल्या अघोरी विधीच्या प्रकाराने खळबळ उडाली आहे. माथेरान स्मशानभूमीत अघोरी पूजा झाल्याचे आज सकाळी उघडकीस आले असून, या प्रकारामुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे. सकाळी नगरपालिका कर्मचारी विजय चव्हाण अंतिम संस्कारस्थळाची नियमित पाहणी करण्यासाठी स्मशानभूमीत गेले असता त्यांना धक्कादायक दृश्य दिसले. स्मशानभूमीच्या मध्यभागी लाल भोपळे, सुरी, त्यावर ठोकलेल्या अगरबत्त्या, मोठी मडकं, कापलेल्या बकऱ्याची मुंडी, मास्यांचे तुकडे तसेच ताजे रक्त जमिनीवर पसरलेले दिसले. स्मशानभूमीच्या कडेला खोदलेले दोन खोल खड्डे देखील संशयास्पद अवस्थेत आढळले.



विजय चव्हाण यांनी तातडीने नगरपालिका आणि स्थानिक पोलीस प्रशासनाला याची माहिती दिली. पहाटेच्या सुमारास कोणी तरी व्यवस्थित तयारी करून संपूर्ण रात्री अघोरी विधी केला असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.दरम्यान, माथेरान शहरात निवडणूक वातावरण तापले असताना असा प्रकार समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये भीती आणि संभ्रम निर्माण झाला आहे. निवडणुकीत दबावतंत्र म्हणून काळी जादू, अघोरी कृती किंवा मानसिक दडपण आणण्याचा प्रयत्न तर नाही ना? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

अशा प्रकारच्या घटना माथेरानमध्ये याआधी कधीही समोर आल्या नव्हत्या. हे कोणीतरी जाणूनबुजून निवडणुकीच्या काळात वातावरण अस्थिर करण्यासाठी केले असावे, अशी प्रतिक्रिया माथेरानच्या काही ज्येष्ठ नागरिकांनी दिली. माणगाव आणि माथेरान पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा सुरू केला आहे. परिसरात लावलेल्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरु आहे. रात्री स्मशानभूमीत कोण आले होते? याचा शोध घेतला जात आहे. संशयास्पद वस्तूंचे नमुने तपासणीसाठी फॉरेन्सिक प्रयोग शाळेत पाठविण्यात आले आहे.




## पुन्हा भारताबाबत खळबळजनक दावा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त दावा केला आहे. पुन्हा एकदा त्यांनी भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या युद्धविरामाचं श्रेय स्वत:ला दिलं आहे. बुधवारी यूएस-सौदी इन्हेस्टमेंट फोरममध्ये प्रिंस मोहम्मद बिन सलमान यांच्यासोबत बोलताना ट्रम्प यांनी मोठा दावा केला आहे. मी भारत आणि पाकिस्तानला जेव्हा ३५० टक्के टॅरिफ लावण्याची धमकी दिली तेव्हा दोन्ही देशांनी युद्ध थांबवल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. एवढंच नाही तर मला स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा त्यावेळी फोन आला होता त्यांनी म्हटलं की आमचं काम झालं आहे, आता आम्ही युद्ध करणार नाहीत, असंही ट्रम्प यांनी यावेळी म्हटलं आहे. ट्रम्प यांच्या या दाव्यामुळे पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. दरम्यान भारताच्या वतीनं ट्रम्प यांच्या या वक्तव्यावर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाहीये.

मी वाद सोडवण्यामध्ये एक्सपर्ट आहे, त्यावेळी भारत आणि पाकिस्तामध्ये अणु युद्ध सुद्धा झालं असतं. मात्र तेव्हा मी दोन्ही देशांना धमकी दिली, म्हटलं तुम्ही लढू शकता, मात्र मी दोन्ही देशांवर ३५० टक्के टॅरिफ लावेल. अमेरिकेसोबत तुमचा कोणताही व्यापार होणार नाही, असं मी सांगीतल्यानंतर दोनच दिवसांमध्ये दोन्ही देशांनी माझ्यावर फोनवरू संवाद साधला. यामुळेच भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धविराम होऊ शकला, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. दरम्यान पुढे बोलताना त्यांनी असा दावा देखील केला आहे की, मी भारत आणि पाकिस्तानला धमकी दिली होती, की तुम्ही जर युद्ध थांबवलं नाही तर मी तुमच्यावर ३५० टक्के टॅरिफ लावण्याच्या तयारीमध्ये आहे. जेव्हा भारत आणि पाकिस्तानमध्ये संघर्ष वाढला तेव्हाच मी सर्व तयारी केली होती. मी आमच्या अर्थमंत्र्यांना देखील म्हटलं होतं की, आपण युद्ध सुरू राहिलं तर त्यांच्यावर ३५० टक्के टॅरिफ लावू, मात्र जर दोन्ही देशांकडून युद्धविरामाची घोषणा झाली तर आपण त्यांच्यासोबत एक चांगला व्यापार करू, मी फक्त टॅरिफची धमकी देऊन आठ पैकी पाच युद्धांमध्ये युद्धविराम घडवून आणला असा दावाही ट्रम्प यांनी केला आहे.

दरम्यान मला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा त्यावेळी फोन आला होता, त्यांनी मला म्हटलं आमचं काम झालं आहे, आता आम्ही युद्ध करणार नाही. मग मी त्यांना विचारलं की तुमचं नेमकं काय काम झालं आहे? त्यावर मोदींनी उत्तर दिलं की आता आम्ही युद्ध करणार नाही. त्यावेळी मी त्यांचे आभार मानले असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

## खाजगी शिक्षण संस्थाकडून शासनाची फसवनुक!

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि,२०, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यात नव्हेतर, महाराष्ट्रात रयत शिक्षण संस्था वगळता,खाजगी शिक्षण संस्था मध्ये नविन शिक्षक भरण्यास मिळावे ह्या हेतुने पारनेर तालुक्यासह संपुर्ण महाराष्ट्रात प्रत्येक खाजगी शिक्षण संस्था मध्ये शिक्षक अतिरीक्त होउ नये,व विद्यार्थी संख्या कमी असतांना ही नविन शिक्षक मिळावे म्हणुन संच मान्यता २०२४-२५ मध्ये अतिरीक्त झालेले शिक्षक त्याच शाळेत ठेवण्यासाठी बाहेरच्या विनाअनुदानीत शाळेतील दाखले जमा करुन आपल्या जनरल रजिस्टरला नोंदवने व संच मान्यता २०२५-२६ ची पट संख्या पोर्टलवर नोंदवुन घेतलेल्या शाळेचे दाखले परत देणे हा चाललेला बनावट कारभाराकडे संबधीत शिक्षण अधिकारी यांचे दुर्लक्ष का? होत आहे ही खेदाची बाब आहे.

दरम्यानच्या काळात शाषनाच्या शालेय पोषन अहार विद्यार्थी नसतांना ह्या संस्थांनी बोगस लाटल्याचे चित्र आज दिसत आहे.

आज ही पटसंख्या आणी १० अक्टोबर २०२५ ची संख्या शिक्षणअधिकार्यांनी शाळेत व्हिजीट देऊन तपासनी केल्यास २०२५-२६ ची संच मान्यता द्या नविन शिक्षक भरती केल्यास संस्था चालकांना लाखोंरुपये मिळतात ही वस्तुस्थिती आहे.

तरी शिक्षणअधिकारी यांनी प्रत्येक संस्था समक्ष पाहानी करण्यासाठी आपले लक्ष केंद्रित करावे. असे ठझड स्टार न्युजचे पश्मिम महाराष्ट्राचे उपाध्यक्ष व माहीती सेवा समितीचे तालुका अध्यक्ष राजकुमार इकडे यांनी शिक्षण मत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# बाळासाहेबांचा सच्चा स्वामिनिष्ठ सैनिक : संजय राऊत

संजय राऊत होणे कोणाच्या बस की बात नाही. त्यासाठी माणूस झपाटलेला, वेडा आणि स्वामिनिष्ठ लागतो...

आज इतका गंभीर आजार झालेला असताना, घरातून बिलकुल बाहेर पडायचे नाही असा डॉक्टरांचा कडक सल्ला असतांना देखील बाळासाहेबांच्या श्रद्धेपोटी त्यांचे पाय थरथरत शिवतीर्थावर पोहचले. काय ते प्रेम, काय त्या भावना, काय मातीचा बनलाय हा माणूस. बाळासाहेबांचा सच्चा स्वामिनिष्ठ सैनिक. दिवसेंदिवस या शिवसैनिक माणसावर प्रेम अजून वाढत जाते. मला वाटत नाही संजय राऊतरपणा त्यांच्या आयुष्यात त्यांच्या बायको- मुलांवरही इतक प्रेम करत असतील, जितक ते बाळासाहेब आणि ठाकरे कुटुंबावर करतात.आज त्यांना पाहून मला अश्रू आले डोळ्यात. काय वेदना आणित्रास होत असेल त्यांना, याची कल्पना त्यांनाच असेल, पण वर सेनापती कधी हार मानत नाही. आज त्यांची बॉडीलाईन पहा. हात थरथरत असले तरी छाती वाघा सारखी होती, नजर करारी होती. सुनील राऊतांचे देखील मला मनापासून कौतुक वाटते, सावली बनून भावा सोबत खंबीर उभा राहतो हा माणूस. इडी चे प्रकरण झालेले तेव्हा देखील त्यांनी साथ निभवली आणि आजही त्यांना पाहिले. खरच कौतुक आहे. संजय राऊत स्मृतीस्थळावर आल्यावर शिवसेनाप्रमुख पण आकाशातून बोलत असतील माझा शेर आला. पणा राऊत साहेब, लवकर लवकर बरे व्हा. आम्ही तुमची डरकाळी मिस करतोय.

महाराष्ट्राच्या राजकीय आणि सांस्कृतिक भूमीत 'संपादक' हा शब्द केवळ एका पदाचा उल्लेख नाही तो एक विचार आहे, एक जबाबदारी आहे आणि अनेकदा तोच जनतेचा आवाजही बनतो. जेव्हा शब्दांची धार तलवारीसारखी तीक्ष्ण असते आणि ती सत्याच्या बाजूने चालते, तेव्हा ती समाजाला दिशा देते. अशा लेखणीचा योद्धा म्हणजे संजय राऊत -'सामना'चे कार्यकारी संपादक, शिवसेनेचे विचारवंत आणि राज्यसभेचे खासदार...



अलीकडे प्रकृतीच्या कारणास्तव राऊत काही दिवस विश्रांती घेत असले तरी रुग्णालयात असतानाही त्यांनी लेखन थांबवू शकत नाही असे आपल्या लेखणीतून सांगितले हे केवळ एक वाक्य नव्हे, तर त्यांच्या जीवनवृत्तीचे प्रतीक आहे. लेखन हे त्यांच्या श्वासाइतकेच नैसर्गिक आहे, आणि हाच बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा त्यांनी जपला आहे.

१५ नोव्हेंबर १९६१ रोजी रायगडच्या अलिबागमध्ये जन्मलेले संजय राऊत हे मूळ पत्रकार. त्यांच्या आयुष्याचा पहिला अध्याय क्राइम रिपोर्टर म्हणून सुरू झाला. सत्य शोधण्याची वृत्ती आणि निर्भय प्रश्न विचारण्याची सवय यामुळे त्यांना लवकरच ओळख मिळाली. पण त्यांची लेखणी केवळ बातम्यांपर्यंत थांबली नाही ती विचारांचा आणि जनभावनांचा आवाज बनली.

'सामना'च्या कार्यकारी संपादकपदी पोहोचण्यापर्यंतचा प्रवास हा एका सामान्य पत्रकाराच्या असामान्य चिकाटीचा पुरावा आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी निर्माण केलेल्या सामनाला त्यांनी केवळ जिवंत ठेवले नाही, तर त्या पत्रातून महाराष्ट्राच्या अस्मितेचा ठसा उमटवला. त्यांच्या लेखनातला थेटपणा आणि स्पष्टवक्तेपणा हीच त्यांची खरी ताकद आहे- जशी रायगडच्या खडकाळ भूमीवरून उसळणारी लाट, तशीच त्यांची लेखणी निर्भय, थेट आणि अडवता न येणारी.

राऊत यांच्या लेखनात बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा आत्मा आहे. बाळासाहेब जसे निर्भीडपणे अन्यायावर प्रहार करायचे, तसेच राऊतही शब्दांच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारतात, समाजातील विसंगती उघड करतात.त्यांचे प्रसिद्ध सदर दीदीमंत्र, रोखठोक हे याचेच उदाहरण यातून ते जनतेच्या भावनांना, आक्रोशाला आणि आकांक्षांना थेट शब्द देतात. विरोधात असलेल्यांना कदाचित त्यांच्या अशा वागण्याने त्रासही होत असेल, काहींनी त्यांना सकाळचा भोंगा' म्हणूनही उपाधी दिली, तर अनेकांनी त्यांना 'महाराष्ट्राचा आवाज' म्हणून गौरविले. कारण त्यांच्या लेखणीने अनेकदा न बोलू शकणाऱ्यांचा आवाज दिला आहे. त्यांच्या लेखात केवळ राजकारण नसते तेथं असतो महाराष्ट्राच्या मातीचा सुगंध, मराठी




अस्मितेचा जाज्वल्य अभिमान आणि सामान्य माणसाच्या मनातली तळमळ.. तिही बाळासाहेबांच्या शैलीत..!!!

'सामना'च्या माध्यमातून विचार मंडण्याबरोबरच राऊत यांनी बाळासाहेबांवर आधारित 'ठाकरे' चित्रपटाची कथा लिहिली. हा चित्रपट म्हणजे एका विचारांचा आणि एका आंदोलनाचा प्रामाणिक आलेख होता.

राऊत यांनी या चित्रपटात बाळासाहेबांच्या जीवनातील निर्भयता, ठाम भूमिका आणि समाजाप्रति असलेली निष्ठा चित्रित केली. त्या लेखनातून त्यांनी बाळासाहेबांना जणू श्रद्धांजलीच दिली. अलीकडेच संजय राऊत यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना मुंबईतील फोर्टिस रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना विश्रांतीचा सल्ला दिला. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे त्यांच्या कुटुंबाने स्पष्ट केले आहे. पण तरीही संपूर्ण महाराष्ट्र आणि शिवसेना परिवार त्यांच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करत आहे. कारण त्यांचा आवाज थांबला म्हणजे जणू महाराष्ट्राचा एक ठेका थांबतो तो ठेका पुन्हा उमटावा, हीच साऱ्यांची इच्छा.. मग त्यात त्यांचे समर्थक असो वा विरोधक...!

संजय राऊत हे केवळ संपादक नाहीत, तर ते विचारांचे रणांगण सांभाळणारे शब्दांचे योद्धे आहेत. त्यांच्या लेखणीने बाळासाहेबांच्या स्वप्नांना नव्या पिढीपर्यंत पोहोचवले. त्यांचे शब्द फक्त कागदावर उतरतात असं नाही ते विचारांना चेतना देतात, कृतीला प्रेरणा देतात आणि समाजात चर्चा निर्माण करतात.

त्यांच्या लेखणीतून महाराष्ट्राची आत्मकथा लिहिली जाते. म्हणूनच आज संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या लवकर स्वास्थ्यलाभासाठी प्रार्थना करतो आहे सध्या राऊतांचे विरोधकही एका कडव्या विरोधकाला मुकत आहेत. त्यामुळे संजय राऊत यांचा आवाज पुन्हा घुमो, त्यांच्या लेखणीतून पुन्हा सत्याची ठिणगी पेटो आणि हा लढवय्या पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या मातीला स्फुरण देवो हीच महाराष्ट्राच्या मराठी माणसाची मनापासून इच्छा... !

## स्यमंतक..

जे अगदी जवळचे
तेचं अधिक घातक
चूक असू दे नसू दे
डोईवर बसे पातक

जो अति विश्वासक
बनवा तया हस्तक
अफवाघुसवा खोल
भडकू टाक मस्तक

कसे चाललेअंतस्थ
गुप्त बातम्या वर्तक
तालावरतीकसरती
करावे त्यांना नर्तक

भेद छेद परिवारांत
बनवा कुटुंब कर्तक
उलटे फिरवतोकाटे
होऊ शके निवर्तक

फुटत नसे सहजते
महान निष्ठा द्योतक
निष्काम सेवासादर
साक्षातनिष्ठा अर्तक

जयचंद मिळे सर्वत्र
नजरअसता शोधक
कसे उलथलेआसन
हतबलबने संशोधक

प्रयोग जरी उलटला
कुणास सोयरेसुतक
ध्येय आपले एकचि
हवी सत्ता स्यमंतक

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# सत्ता, संधी आणि 'घराणेशाही'ची साखळी

**- शब्दांकन -**
**साहेबराव परबत**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नगरपालिका व नगरपंचायत निवडणुका जवल्या आल्या की सर्वत्र राजकीय गडबड सुरू होते. गावोगाव, शहरोगाव पक्षांचे झेंडे फडकू लागतात, कार्यालयांमध्ये गर्दी वाढते, तर विविध पदांसाठी इच्छुक कार्यकर्त्यांकडून संपर्क मोहीम जोर धरते. परंतु प्रश्न असा कीया राजकीय रणधुमाळीत सर्वसामान्य कार्यकर्त्यांना किती संधी मिळते? की पदे आणि तिकिटे शेवटी फक्त 'नेत्यांच्या घरातील' लोकांपुरतीच मर्यादित राहतात?

**✻ सामान्य कार्यकर्त्यांचा संघर्ष !**

पक्षाचा झेंडा हातात घेऊन, उन्हात-पावसात, रात्रंदिवस प्रचार करणारा सामान्य कार्यकर्ता हा कोणत्याही संस्थेची कणा असतो. घर सोडून, व्यवसाय-नोकरी सांभाळून, पक्षाच्या प्रत्येक आह्वानाला प्रतिसाद देणारे कार्यकर्ते वर्षानुवर्षे निष्ठेने योगदान देत असतात.

पण निवडणुका लागल्या की तिकीट वाटपाच्या याद्यांमध्ये त्यांचं नाव क्वचितच दिसतं. त्यांना सांगितले जाते अजून थोडं काम करा, पुढच्या निवडणुकीत पाहू. ही पुढची निवडणूक अनेकांच्या आयुष्यात कधी येतच नाही.

**★ नेत्यांची घराणेशाही : लोकशाहीतील मोठी फट...**

स्थानिक पातळीवर घराणेशाहीचा प्रभाव सर्वाधिक जाणवतो. प्रभागापासून नगराध्यक्षापर्यंत अनेक पदे नेत्यांच्या कुटुंबातील सदस्यांनाच दिली जातात

मुलगा, सून, भाऊ, पत्नी, भाचा

एकच घर, एकच परिवार आणि अनेक पदे असे चित्र अनेक ठिकाणी दिसते. पक्षात जनतेसाठी काम करणारे शेकडो कार्यकर्ते असले



तरी अधिकार काही निवडकांच्या हातातच राहतात. लोकशाहीचा अर्थ जनतेचा सहभाग; पण प्रत्यक्षात ती 'घराण्यांची स्पर्धा' बनून राहते.

**✻ सामान्य कार्यकर्त्यांची खंत वाढते**

- कार्यकर्त्यांमध्ये वाढणारी नाराजी आज अनेक ठिकाणी दिसून येते.
- आम्ही वर्षानुवर्षे काम करतो, पण तिकीट मिळत नाही.
- आम्ही माणसं घेऊन येतो, मतदारांना पटवतो, पण पद नेत्यांच्या नातेवाईकांनाच मिळतं.
- सत्तेवर बसल्यावर आम्हाला विचारहीत घेत नाहीत.
- ही केवळ तक्रार नाही; हे स्थानिक राजकारणातील खोलवर रुजलेल्या व्यवस्थेचं प्रतिबिंब आहे.

लोकशाहीच्या घडीत त्याचा परिणाम

नेत्यांच्या घरातच पदे वाटली गेल्यामुळे निर्माण होणारे दुष्परिणाम गंभीर आहेत.

**१.** नवीन नेतृत्व उदयाला येत नाही

सक्षम, प्रतिभावंत युवक-युवती राजकारणात येण्यापूर्वीच निराश होतात.

**२.** स्थानिक समस्यांकडे दुर्लक्ष

निवडून आलेल्या घराणेशाहीतील प्रतिनिधींना प्रभागाची खरी व्यथा उमजत नाही; कारण त्यांची जमिनीशी फारशी नाळ नसते.

**३.** पक्षातील अंतर्गत असंतोष

पक्षाचे तळागाळातील कार्यकर्ते दुरावतात, ज्याचा परिणाम मतदानावरही होतो.

**४.** जनतेचा विश्वास ढळू लागतो

लोकांमध्येही भावना निर्माण होते की निवडणूक ही केवळ काही मोजक्या घरांचीच स्पर्धा आहे.

**✻ सुधारणा काय?**

- या परिस्थितीत बदल घडवण्यासाठी काही उपाय महत्त्वाचे
- पक्षांनी वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्राधान्य देण्याचा स्पष्ट नियम करावा.
- निवडणूक तिकिटांमध्ये कमीतकमी ३०% हिस्सा सामान्य कार्यकर्त्यांसाठी राखून ठेवणे आवश्यक.
- प्रभागनिहाय कार्यकर्त्यांच्या कार्यमूल्यांकनाची पारदर्शक व्यवस्था असावी.
- पदावाटपात नातेवाईकांना प्राधान्य देऊ नये ही नैतिक संहिता बंधनकारक असावी.

**✻ शेवटचा निष्कर्ष**

लोकशाही फुलते ती सामान्य माणसाच्या सहभागातून. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जर केवळ नेत्यांच्या घरातील लोकच सतत पुढे येत राहिले, तर लोकशाहीची व्याप्ती सिमेंटच्या भिंतीसारखी घट्ट आणि बंदिस्त होते. सत्ता चालवणारे आणि सत्ता मिळवण्यासाठी लढणारे, दोघांनीही हे विसरू नये कार्यकर्ता हा पक्षाचा प्राण असतो. त्याची उपेक्षा म्हणजे लोकशाहीची उपेक्षा.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## विंचूर नगरीत श्रीगुरु दत्त पादुकांचे आगमन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक)** : गुरुवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी विंचूर नगरीत लासलगाव येथील पुरातन जागृत दत्त मंदिरातील श्री दत्त महाराजांच्या पावन पादुकांचे आगमन होताच संपूर्ण नगरीतील वातावरण भक्तिभावाने दुमदुमून गेले. दत्तभक्तांनी पारंपरिक भिक्षा फेरी व परिक्रमा उत्साहात काढत घरोघरी जाऊन श्री दत्त महाराजांची आरती, मंत्रपुष्पांजली अर्पण करून प्रसाद वाटला.

पादुकांचे दर्शन घेण्यासाठी लहान - मोठ्या भक्तांनी मोठी गर्दी केली असून दत्त स्वरूपाचे मनोभावे दर्शन घेतले. या पावन परिक्रमेसोबत विंचूर नगरीत उपस्थित असलेले विवेक महाराज त्याल्हारकर, उमाजी कुमावत, चैतन्य खलसे, ओंकार सोनवणे, रवींद्र काका बकरे, गणेश देवकर, बाळकृष्ण मालपाणी, दिलीप मालपाणी, डॉ.मालपाणी, निरज भट्टड, कैलास सोनवणे, प्रकाश गाडे, देवसिंग परदेशी, शरद फीटर, राजेंद्र विभूते, अण्णासाहेब चव्हाण, शांताराम भवर तसेच पत्रकार सुनील क्षिरसागर यांसह अनेक दत्तभक्तांनी दर्शनाचा, प्रसादाचा लाभ घेतला. पादुका आगमनाने विंचूर नगरीत सर्वत्र भक्तिभाव, सद्भाव आणि पावनता अनुभवायला मिळाली.

## मुंबई महापालिकेत मनसे आणि ठाकरेंची युती होणार?




**दि.२०, मुंबई :** राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी येत्या २ डिसेंबरला मतदान होणार आहे. तर ३ डिसेंबरला लगेचच मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलत आहेत. त्यातच आता शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या संभाव्य युतीबद्दलची चर्चा आता अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे बोललं जात आहे. या युतीमुळे मुंबईच्या राजकारणात मोठा भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ठाकरे गटाकडून मनसेला ७० जागांचा प्रस्ताव देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या दोन्ही पक्षांनी मुंबई महानगरपालिकेत एकत्र निवडणूक लढवल्यास भाजप आणि शिंदे गटाच्या शिवसेनेसमोर मोठे आव्हान उभे राहील, असा अंदाज वर्तवला जात आहे. या संभाव्य युतीवर मनसे नेते अमित ठाकरे यांनीही एक मोठे विधान केले आहे.

- **ठाकरे गटाच्या युतीच्या चर्चांना बळ !**

अमित ठाकरे यांना नुकतंच ठाकरे बंधू एकत्र आल्याने भीती दाखवली जाते का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी स्पष्ट उत्तर दिले. दोन्ही ठाकरे एकत्र येण्याची भीती मुंबई महापालिकेत दिसेल, असे अमित ठाकरे म्हणाले. अमित ठाकरे यांच्या या वक्तव्यामुळे मनसे आणि ठाकरे गटाच्या युतीच्या चर्चांना बळ मिळाले आहे. तसेच येत्या महापालिका निवडणुकीत ही युती प्रत्यक्षात येणार असून त्याचा थेट परिणाम निवडणुकीच्या निकालात दिसेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

दरम्यान मुंबई महापालिका ही देशातील सर्वात श्रीमंत महापालिका मानली जाते. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ या महापालिकेवर शिवसेनेची सत्ता आहे. मात्र आता राज्यात झालेल्या मोठ्या राजकीय उलथापालथीमुळे शिवसेनेमध्ये फूट पडली आहे. या फुटीनंतर आता ठाकरे गट आणि मनसे एकत्र येऊन पुन्हा एकदा मराठी मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न करतील, अशी शक्यता आहे.

- **महायुतीला निवडणुकीची रणनीती बदलावी लागणार**

ठाकरे गट आणि मनसेच्या युतीमुळे भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना महायुतीवर मोठा दबाव पडेल असे म्हटलं जात आहे. भाजपने मुंबई महापालिकेवर वर्चस्व मिळवण्यासाठी मोठे प्रयत्न सुरू केले आहेत. यासाठी शिंदे गटाची साथ महत्त्वाची मानली जात होती. मात्र आता दोन्ही ठाकरे एकत्र आल्यास महायुतीला आपली निवडणुकीची रणनीती बदलावी लागू शकते. त्यामुळे मुंबईत ठाकरे विरुद्ध महायुती अशी थेट लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## बसचा ब्रेक फेल, वाट बघत असलेल्या प्रवाशांना चिरडलं



**दि.२०, नाशिक :** नाशिकच्या सिन्नर बस स्थानक येथे बसचा ब्रेक फेल झाल्यानं भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बसचा ब्रेक फेल झाल्यानं झालेल्या अपघातात एका ९ वर्षीय चिमुरड्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. बसचे ब्रेक फेल झाल्यानं बस थेट फलटावर घुसली. सिन्नर बस स्थानक येथून बस क्रमांक एमएच १३ सीयू ८२३७ ही सुटणार होती. सकाळी १० वाजून ५० मिनिटाच्या सुमारे चालकाने सिन्नर आगारामधून बस फलटावर आणत असताना अचानक बसचे ब्रेक फेल झाले. चालकाने बसवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, बसवरील नियंत्रण सुटल्यानं ही बस थेट फलटावर उभ्या असलेल्या प्रवाशांच्या अंगावर जाऊन धडकली.

या भीषण अपघातात गौरी योगेश बोऱ्हाडे यांचा ९ वर्षीय मुलगा आदर्श बोऱ्हाडे, ज्ञानेश्वर रामकृष्ण भालेराव आणि विठाबाई ज्ञानेश्वर भालेराव आदी प्रवासी बसखाली आले. या धडकेत आदर्श बोऱ्हाडे (वय ९) या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर इतर तीनजण हे या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. या संपूर्ण घटनेचा उउढत समोर आला आहे. या अपघातातील जखमींना अधिक उपचारासाठी नाशिक येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून अधिक उपचार सुरू आहेत. पोलिसांनी बसचालक याला ताब्यात घेतलं असून सिन्नर पोलीस ठाण्यात बस चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, अपघातानंतर आजूबाजूच्या नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केलं. जखमींना तातडीने नाशिक येथील खासगी रुग्णालयात हलवण्यात आलं. मात्र, रस्त्यातच आदर्शने प्राण सोडले. आईसह अन्य दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचं सूत्रांनी सांगितलं. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बसचालकाला ताब्यात घेतलं.

# अहिल्यानगर जिल्ह्यात जेथे बिबट्याचा वावर तेथे शाळांच्या वेळेत बदल

## जिल्हाधिकार्यांचे आदेश; शाळा व्यवस्थापन समितीवर निर्णय



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील काही भागांत बिबट्यांचे हल्ले वाढत आहेत. पारनेर, कोपरगाव, संगमनेर, राहुरी, अकोले, अहिल्यानगर तालुक्यांमध्ये अशा घटना घडल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांचा या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. यामुळे बिबट्या प्रवण आपत्ती क्षेत्रातील शाळांच्या वेळेत सकाळी ९.३० ते दुपारी ४ असा बदल करण्यास परवानगी देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी तसे आदेश दिले आहेत. जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांनी शाळा व्यवस्थापन समिती, शाळा समितीची मंजूरी घेवून वेळेत बदल करावा, असे आदेशात नमूद केले आहे.

जिल्ह्यामध्ये लहान मुलावरील बिबट्यांच्या हल्ल्यांच्या घटना पारनेर, अहिल्यानगर तालुक्यांमध्ये घडल्या आहेत. शालेय विद्यार्थी यामध्ये जखमी व मयत झाले आहेत. दिवसेंदिवस बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या घटना लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळेच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. जिल्ह्यातील बहुतांश शाळांमधील विद्यार्थी पायी शाळेत येतात व शाळा सुटल्यावर पायी घरी जातात. रस्त्याच्या कडेने ऊस, जंगल, डोंगराळ असे बिबट प्रवण आपत्ती क्षेत्र आहे. सध्या ऊस तोडीमुळे उसाचे क्षेत्र कमी होत असल्याने बिबट्यांचे हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच सद्यस्थितीत हिवाळा ऋतूमुळे सायंकाळी लवकर अंधार पडत असल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे.

बिबट्यांच्या हल्लयामुळे विद्यार्थ्यांना धोका पोहचू नये यासाठी शाळांच्या वेळेत सकाळी ९.३० ते दुपारी ४ असा बदल शाळा व्यवस्थापन समिती/शाळा समितीची मंजूरी घेवून करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच शाळास्तरावर पालक मेळावे घेऊन शाळेत येताना व शाळा सुटताना पाल्यांना स्वतः घेऊन जाणेबाबत पालकांना कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक विद्यार्थी सुरक्षित घरी पोहोचल्याची वर्गशिक्षकांनी खात्री करणे आवश्यक आहे. तसेच शालेय स्तरावरील विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीच्या सभा दरमहा घेऊन विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजनांची अंमलबजावणी करावी अशा सूचना दिल्या आहेत. गट शिक्षणाधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील किती शाळांच्या वेळेत बदल झाला याचा अहवाल तात्काळ शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांना सादर करावा, असेही आदेशात नमूद केले आहे.

# निवोशी दणदणेवाडी येथील रखडलेल्या पाखाडीचे काम सुरु; ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२०, निवोशी (गुहागर)** : गुहागर तालुक्यातील निवोशी दणदणेवाडी येथील गेली अनेक वर्षं रखडलेल्या पाखाडीचे काम सुरू झाल्याने दणदणेवाडी ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवोशी गाव विकासात दणदणेवाडीला नेहमीच दुय्यम स्थान दिले गेल्याने येथील पाणी, वीज, रस्ते यासाठी येथील ग्रामस्थांना शासनाच्या विविध समाजकल्याण योजना प्राप्त करण्यासाठी ग्रामस्थांना मोठा संघर्ष करावा लागला आहे,गेली अनेक वर्षे दणदणेवाडी ग्रामस्थांना येथील सर्वपक्षीय प्रतिनिधी, पुढाऱ्यांनी दणदणेवाडी ग्रामस्थांना अनेक निवडणुकीत फक्त मतांसाठी गृहीत धरले गेल्याने वाडी विकासाला मोठी खीळ बसली होती. या सर्व बाबींचा विचार करून वाडीप्रमुख उदय दणदणे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यायाने दणदणेवाडी ग्रामस्थांनी आता वाडी विकासाला प्राधान्य दिला आहे.



येथील पाखाडीची गेली अनेक वर्षे ग्रामपंचायत स्तरावर मागणी होती, सदर मागणीवर येथील दणदणेवाडी प्रमुख तसेच सामाजिक कार्यकर्ता/पत्रकार उदय दणदणे, वाडी प्रमुख संतोष दणदणे, अनंत दणदणे, रमेश दणदणे, सुरेश दणदणे यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता, ग्रामस्थांची ही महत्वपूर्ण समस्या लक्षात घेऊन पालशेत-निवोशी ग्रामपंचायत माजी उपसरपंच पंकज बिर्जे यांनी पाखाडीचे काम लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. जवळजवळ दोन वर्षे येथील उपसरपंच पंकज बिर्जे यांचे प्रयत्न सुरू होते, अखेर बिर्जे यांच्या प्रयत्नांतून १५ वा वित्त आयोग निधीतून पाखाडीला निधी उपलब्ध होऊन पाखाडीचे काम सुरू झाले आहे. सदर पाखाडीला उदय दणदणे यांनी विनामोबदला सहमती देत जागा उपलब्ध करून दिली

पंकज बिर्जे यांनी राजकारण बाजूला ठेवत निवोशी गाव विकासावर भर देत विविध विकासात्मक कामे केली आहेत. नजीकच्या काळात दणदणेवाडीच्या उर्वरित पाखाडीचे पुढच्या टप्प्यातील काम लवकरच मार्गी लावणार असल्याचे माजी उपसरपंच पंकज बिर्जे यांनी सांगितले. गेली अनेक वर्षे येथील ग्रामस्थ पाखाडीच्या प्रतिक्षेत होते. अखेर पाखाडीचे काम सुरू झाल्याने दणदणेवाडी मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# विदर्भ किसान मजदूर काँग्रेसतर्फे भारतरत्न इंदिरा गांधी यांना आदरांजली

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** राष्ट्रमाता प्रियदर्शिनी इंदिराजी गांधी यांनी देशाच्या अखंडतेसाठी प्राणार्पण केले. त्या आपल्या प्रेरणास्त्रोत असून आदर्श आहे. त्यांच्या आदर्शानुसार आपण कार्य केले पाहिजे, असे आवाहन माजी खासदार नरेशबाबू पुगलिया यांनी केले. इंदिराजी गांधींचे जीवन हे प्रेरणेचे जीवन आहे. धैर्य, निष्ठा, समर्पण हे त्यांच्या व्यक्तीमत्वाचे मूलभूत तत्व होते. आजच्या युगातही त्यांचे विचार, त्यांची ऊर्जा आणि त्यांचा ध्यास आपल्याला पुढे नेण्यास सक्षम आहे. दूरदृष्टी, ठाम नेतृत्व आणि राष्ट्रनिष्ठा यांचा अद्वितीय संगम घडवित भारताला स्थिरता सामर्थ्याकडे नेले. देशातील अन्नटंचाईची भीषण समस्या दूर करून हरितक्रांतीद्वारे भारताला अन्नसुरक्षिततेचा आत्मविश्वास दिला.

बांग्लादेश मुक्तीसंग्रामाच्या काळात निर्णायक भूमिका, बँकांचे राष्ट्रीयकरण, कोलमाईन्सचे राष्ट्रीयकरण, आदिवासी आश्रम शाळेची निमिर्ती, दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे भारत जगासमोर अधिक बळकट आणि सक्षम राष्ट्र म्हणून उभा राहिला. असे मत नरेशबाबूजींनी व्यक्त केले. विदर्भ किसान मजदूर काँग्रेस जिल्हा चंद्रपूरच्या वतीने देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान आयर्न लेडी (लोह-महीला) राष्ट्रमाता इंदिराजी गांधी यांच्या १०८ वी जयंतीदिना निमित्य दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्थानिक प्रियदर्शिनी चौकातील राष्ट्रमाता इंदिराजी गांधी यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात माजी खासदार नरेशबाबू पुगलिया यांच्या मार्गदर्शनात युवा नेते राहुलबाबू पुगलिया यांच्या शुभहस्ते श्रीमती इंदिराजी गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली व विदर्भ किसान मजदूर काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी तसेच इंदीरा गांधी गार्डन स्कूल व न्यु इंग्लीश हायस्कुलच्या सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी पुष्पफुल अर्पण करून आदरांजली वाहिली.

राष्ट्रमाता इंदिराजींच्या जयंती निमित्य पुतळ्याला व पुतळा परिसरात सुशोभित लायटिंग व्यवस विदर्भ किसान मजदूर काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. राष्ट्रमाता इंदिराजीच्या जयंती निमित्य मिठाई व अल्पोपहार वाटप करण्यात आला.



या कार्यक्रमाप्रसंगी विदर्भ किसान मजदूर काँग्रेसचे ग्रामिण जिल्हा अध्यक्ष ॲड. अविनाश ठावरी, जिल्हा महासचिव तथा माजी नगरसेवक अशोक नागापूरे, शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक देवेंद्र बेले, चंद्रशेखर पोडे, पंकज गुप्ता, माजी नगरसेवक विनोद पिंपळशेंडे, श्रीनिवास पारनंदी, स्वप्नील तिवारी, अमोल हलदर, निताई घोष, पृथ्वी जंगम, बी. के मुन, सुधाकरसिंह गौर, कामगार युनियनचे क्रिष्णन नायर, रामदास वागदरकर, विरेंद्र आर्या, अनिल तुंगीडवार, गजानन दिवसे, सुदर्शन पुल्ली, विनोद मोहता, महेश वाटेकर, सुमित नगराळे, मुर्लीधर चौधरी, हेमंत आक्केवार, प्रमोद कस्तुरे, आतिश आक्केवार, शेखर कोतपल्लीवार, श्रीकांत पुष्पलवार, महेश ठोंबरे, सतीश नेवटला, अंकुश नारलावार, सुनील दुबे, प्रकाश सौंग, विजय शर्मा, राकेश तासलवार, गोपाल कुडूपले, कमलेश मीत्तरवार, वामन खडतकर, शाम बडकलवार, अजय धुबडे, आदित्य साहू, अमित अनेजा, संदीप सींग, अमोल गांवडे, व विदर्भ किसान मजदूर काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निराधार योजनेच्या लाभार्थ्यांनी डीबीटी करून घ्यावी : महेंद्र फुलझेले यांचे प्रतिपादन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, विसापूर (चंद्रपूर) :** सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून शासनस्तरावर संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांनी लाभ मिळण्याबाबत डीबीटी करून घ्यावी. प्रत्येक लाभार्थ्यांनी आधार कार्ड मॅपिंग करून नियमित अनुदानाचा लाभ बँक खात्यात जमा होणार आहे. या शिबिराच्या माध्यमातून शासन आपल्या दारी आले आहे.

याचा लाभ निराधार योजनेतील लाभार्थ्यांनी करून घ्यावा, असे प्रतिपादन विसापूर येथे डीएलसी शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी बल्लारपूरचे नायब तहसीलदार महेंद्र फुलझेले यांनी केले. बल्लारपूर तहसील कार्यालयाच्या वतीने विसापूर ग्रामपंचायत सभागृहात निराधारांचे विशेष शिबीर गुरूवारी पार पडले. यावेळी शिबीराचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच वर्षा कुळमेथे होत्या. उद्घाटक म्हणून नायब तहसिलदार महेंद्र फुलझेले, प्रमुख अतिथी उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, बल्लारपूरचे मंडळ अधिकारी किशोर नवले, सहाय्यक महसूल अधिकारी सोनु गावंडे, ग्राम महसूल अधिकारी आरती दुलत, ग्राम महसूल अधिकारी दीपक निंबाळकर, ग्रामपंचायत अधिकारी गणेश कोकोडे यांच्यासह तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. यावेळी संजय गांधी निराधार योजनेच्या व श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेच्या लाभार्थ्यांचे आधार मॅपिंग करून ज्या लाभार्थ्यांचे अनुदान मिळत नाही. अशा लाभार्थ्यांना डीबीटी योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला.



# टाकळी ढोकेश्वरची ग्रामसभा सौरऊर्जा प्रकल्पावरून गाजली

## सौरऊर्जा प्रकल्पाचे काम सुरू; ग्रामसभेत गावकऱ्यांनी दर्शवला विरोध

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल गावच्या पारावर वेशीसमोर गुरुवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या ग्रामसभेत गावानजीक तांदळ्या डोंगराजवळ गायरान जमिनीवर आवादा कंपनीमार्फत गायरान जमिनीवर होत असलेल्या सौरऊर्जा प्रकल्पाला ग्रामस्थांनी कडाडून तीव्र विरोध केला. यावेळी ग्रामस्थांनी जोपर्यंत जिल्हाधिकारी या ठिकाणी ग्राम सभेला उपस्थित रहात नाही तो पर्यंत सौरऊर्जा प्रकल्पाचे काम होऊ न देण्याचा असा निर्धार व्यक्त केला.



उपसरपंच किरण तराळ यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा पार पडली. याप्रसंगी सरपंच अरुणा खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, ग्रामपंचायत सदस्या खिलारी, ग्रामपंचायत सदस्य शुभम गोरडे, ग्राम पंचायत सदस्य दत्तात्रय निवडुंगे, माजी सरपंच सुनिता झावरे, जयसिंग झावरे,बबलू झावरे, बापूसाहेब रांधवण, अंकुश पायमोडे, नितीन खोडदे, विक्रम झावरे, विकास आल्हाट, देविदास आल्हाट, संकेत झावरे, अभि जाधव, श्रावण गायकवाड, किसनराव धुमाळ, मळिभाऊ रांधवण, सुभाष बांडे, आदिंसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर ग्रामसभेत विविध विकासकामांवर चर्चा करण्यात आली. विविध योजना राबविण्यासाठी ग्रामसभेने संमती दिली. यावेळी वैद्यकीय लाभार्थी मागासवर्गीय निधीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. काही भागात पिण्याचे पाणी पोहचत नसल्याची तक्रारही काही ग्राम स्थांनी केली. रस्त्याच्या कडेला असलेल्या अतिक्रमण याबाबत लक्ष देण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले, जलजीवन योजनेच्या झालेल्या सुमार दर्जाच्या कामाबाबत ही ग्राम सभेत आक्षेप घेण्यात आला.

यानंतर टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत हद्दीतील तांदळ्या डोंगराजवळील गट क्रमांक १४३९, १४४०, १४४१ मधील या ५० एकर गायरान जागेवर सुरू करण्यात आलेल्या सौरऊर्जा प्रकल्पाचे काम त्वरित थांबवावे, अशी मागणी ग्राम स्थांनी करीत सदर प्रकल्पाला कडाडून तीव्र विरोध केला. माजी सरपंच शिवाजी खिलारी यांनी सदर सौरऊर्जा प्रकल्प होणार असेल तर त्याचा गावाला फायदा होणार असून, शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा मोफत वीज मिळणार असल्याचे सांगितले.

ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी व कंपनी या ठिकाणी पाहाणी करत नाही तोपर्यंत सदर प्रकल्पाचे काम सुरू केले जाणार नाही असा निर्धार व्यक्त केला. ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना सरपंच अरुणा खिलारी व ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब दावभट यांनी उत्तरे दिली. सुरवातीपासूनच सुरू असलेली ग्रामसभा सौरऊर्जा प्रकल्पाचा काम करून चांगलीच गाजली.

# शासकीय आश्रमशाळा दीर्घकालीन सुट्ट्या कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरण अनुज्ञेय

## आ.अडबाले यांच्या प्रयत्नामुळे मिळालेले यश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळांवरील दीर्घ सुटी विभागातील कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखीकरण लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचा आदिवासी विभागाचा शासन परिपत्रक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित झाल्याने सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यासाठी आमदार सुधाकर अडबाले यांनी सचिवांपासून मंत्र्यांपर्यंत सतत पाठपुरावा करून लाभ मिळवून दिल्याने कर्मचाऱ्यांनी आ. अडबाले यांचे आभार मानले आहे.

दिनांक २५ मार्च २०२५ रोजी आदिवासी विकासाच्या समस्या सोडविण्यासाठी आ. सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने सदर निवेदनाच्या अनुषंगाने आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्यासोबत मुंबई येथे झालेल्या बैठकीत दीर्घकालीन सुट्ट्या असलेल्या कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरण अनुज्ञय आहे, याबाबत चर्चा करण्यात आली होती. पी.के.भोंगाडे व इतर समस्याग्रस्त कर्मचाऱ्यांच्या दिनांक ११/०९/२०२५ च्या पत्राच्या अनुषंगाने नागपूर अप्पर आयुक्त आयुषी सिंग व उपआयुक्त दिगंबर चव्हाण यांच्या उपस्थितीत दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी या विषयावर चर्चा करून शासनाला पत्र पाठवावे, मार्गदर्शन मागविण्यात यावे व तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, असे आ. अडबाले यांनी सुचवले व हा मुद्दा प्रकर्षाने लावून धरला. वरील सभेच्या अनुषंगाने अप्पर आयुक्त आदिवासी विभाग यांनी ३० ऑक्टोंबर २०२५ रोजी सचिव, आदिवासी विकास विभाग मंत्रालय मुंबई यांना शासनाकडून मार्गदर्शन तथा उचित आदेश होण्यास विनंती केली व त्याची प्रतिलिपी आ.सुधाकर अडबाले सर यांना पाठविली. वरील सर्व निवेदन सभा व चर्चेच्या अनुषंगाने आ. सुधाकर अडबाले यांनी सचिव, आदिवासी विकास विभाग व आयुक्त आदिवासी विभाग नाशिक यांना रजा रोखीकरण बाबत निवेदन दिलीत आणि तात्काळ अहवाल मागितला.

वरील सर्व प्रयत्नांती अजय साखरे कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी ३१ ऑगस्ट २०२३ अखेर सेवानिवृत्त झालेल्या आदिवासी विकास विभाग अधिनस्त शासकीय आश्रम शाळेतील दीर्घ सुटी विभागातील संपूर्ण महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांना संचित अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय करण्यात यावे, असे शासन परिपत्रक काढले. त्यामुळे २०१३ पासून प्रलंबित असलेली मागणी मार्गी लागली आणि सदर कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला. याबाबत आ. सुधाकर अडबाले यांचेकडे हा विषय विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष रमेश काकडे, सीटू संघटनेचे विभागीय अध्यक्ष आर. टी. खवशी, सेवानिवृत्त सहाय्यक प्रकल्प अधिकारी पी.के.भोंगाडे व सेवानिवृत्त मुख्याध्यापक के. एन. वालदे यांनी प्रयत्न केलेत. शासकीय आदिवासी विभाग आश्रम शाळा कर्मचाऱ्यांनी आ. सुधाकर अडबाले यांचे आभार व्यक्त केले.

# नमुंमपा सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदार यादी कार्यक्रम जाहीर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार नवी मुंबई महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी गुरुवार, दि.२० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.



राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दि.०१ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या १५० ऐरोली, १५१ बेलापूर व २४४ कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादी वरून महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता प्रारूप मतदार यादी तयार करण्यात आलेली आहे. ही यादी दि.२० नोव्हेंबर २०२५ रोजी महानगरपालिका मुख्यालय तसेच संबंधित प्रभागाच्या विभाग कार्यालयातील नोटीस बोर्डवर तसेच महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारूप मतदार यादीवर दि.२७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार असून प्राप्त हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या ५ डिसेंबर २०२५ रोजी अधिप्रमाणित करून प्रसिद्ध करावयाच्या आहेत. त्याचप्रमाणे दि.०८ डिसेंबर २०२५ रोजी मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. तसेच दि.१२ डिसेंबर २०२५ रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

सदर मतदार यादीची प्रत प्रतिपृष्ठ रू.२/- इतका दर आकारून उपलब्ध करून देण्यात येईल.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसाठी राज्य निवडणूक आयोग स्वतंत्रपणे मतदार यादी तयार करत नसून भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी विधानसभेची मतदार यादी वापरण्यात येते. या करिता १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करुन मतदार यादी तयार करण्यात येते. ही प्रारुप मतदार यादी राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या प्रारुप मतदार यादीत नव्याने कोणतेही नाव समाविष्ट होणार नसून प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीत – (१) लेखनिकांच्या काही चुका असल्यास, (२) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असल्यास, (३) संबधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे समाविष्ट करणे, (४) मृत व्यक्तींची नावे आढळल्यास किंवा त्याबाबत हरकती किंवा सूचना प्राप्त झाल्यास त्यांची नोंद मार्क कॉपी मध्ये घेणे – केवळ अशा प्रकारची सुधारणा / दुरुस्ती करता येईल. विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन आवश्यक त्या सुधारणा मतदार यादीमध्ये करण्यासाठी व अंतिम मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून विभाग प्रमुख व त्यांना सहाय्यक म्हणून इतर अधिकारी, कर्मचारी यांची विभाग कार्यालयनिहाय नियुक्ती करण्यात आली आहे. दिघा विभाग कार्यालयात प्रभाग क्र.१, २, ३ व ऐरोली विभाग कार्यालयात प्रभाग क्र. ४, ५, ७ आणि घणसोली विभाग कार्यालयात प्रभाग क्र. ६, ८, ९ तसेच कोपरखैरणे विभाग कार्यालयात प्रभाग क्र.१०, ११, १२, १३ या प्रभाग क्रमांकांशी संबंधित प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचना विहित नमुन्यात दाखल करता येतील. अशाच प्रकारे तुर्भे विभाग कार्यालयात प्रभाग क्र.१४, १५, १६ व वाशी विभाग कार्यालयात प्रभाग क्र.१६, १७, १८ आणि नेरूळ विभाग कार्यालयात प्रभाग क्र.२०, २१, २२, २३, २४, २५ तसेच बेलापूर विभाग कार्यालयात प्रभाग क्र.२६, २७, २८ या प्रभाग क्रमांकांशी संबंधित प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचना विहित नमुन्यात दाखल करता येतील.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जाहीर करण्यात आलेल्या नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदार यादीच्या कार्यक्रमाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# थोडक्यात

## बालकलाकार विनायक कऱ्हाळेचा मराठी चित्रपट ‘ऊत भावनांचा उद्रेक‘ प्रेक्षकांच्या भेटीला



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, परभणी :** अनेक राष्ट्रीय आणि अंतर राष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल मध्ये आपली छाप पडल्यानंतर वेरा फिल्म्स निर्मित आणि राम मलिक दिग्दर्शित मराठी चित्रपट ऊत – भावनांचा उद्रेक हा येत्या २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सर्व चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे या चित्रपटात परभणीचा बाल कलाकार विनायक कऱ्हाळे हा नायकाच्या बालपणीच्या भूमिकेत अभिनय करताना दिसणार आहे. त्याने शरणम ही भूमिका साकारली आहे.

या चित्रपटात त्याची भूमिका ही विनोदी, मस्तीखोर, रोमँटिक आणि भावनिक अशी आहे. हा नायक कशा प्रकारे संघर्ष करून जिद्दीच्या जोरावर स्वतः चे आणि आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करतो हे यामध्ये पाहायला मिळणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक राम मलिक यांनी त्याला या चित्रपटात अभिनय करताना मोलाचे मार्गदर्शन केले आहे. या चित्रपटात त्याने अभिनय करताना सगळ्या प्रकारचे सीन्स करताना त्याने खूप मेहनत घेतल्याचे दिग्दर्शक राम मलिक सांगतात. परभणी सारख्या शहरातून मुंबईत जाऊन त्याने आपली अभिनय आवड जोपसली आहे. त्याचा मे २०२५ मध्ये २६ नोव्हेंबर हा मराठी चित्रपट देखील प्रदर्शित झाला होता. लवकरच तो चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर देखील सर्वांना पाहता येईल. तसेच तो सध्या एका मोठ्या हिंदी चित्रपटात देखील काम करत असून त्या चित्रपटाचे शूटिंग सध्या सुरु आहे. त्याने मालिका, नाटक आणि जाहिरात क्षेत्रात देखील काम केले आहे. सध्या तो दहावी वर्गात शिकत आहे. त्याचे मुळगाव परभणी जिल्ह्यातील ताडलिंबला आहे. संकर्षण कऱ्हाडे, अजिंक्य राऊत यासारख्या परभणीकर कलाकार यांच्यासोबत आता विनायक कऱ्हाळे या कलाकाराची देखील भर पडली असून परभणीकरांसाठी ही आनंदाची बातमी आहे. त्याच्या या चित्रपटाला सर्व परभणीकरानी भरभरून प्रेम, आशीर्वाद आणि प्रतिसाद देण्याचे आवाहन विनायक आणि परिवाराने यानिमित्ताने केले आहे.

## रणकोळ केंद्राच्या केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेला उत्साहपूर्ण सुरुवात



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२०, डहाणू (पालघर) :** डहाणू आदिवासी प्रकल्पातील रणकोळ केंद्रामार्फत आयोजित केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धांना गंजाड येथील अनुदानित आश्रमशाळेत उत्साहपूर्ण सुरुवात झाली. या स्पर्धांचे उद्घाटन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणूचे प्रकल्प अधिकारी मा. विशाल खत्री (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याला शिक्षण प्रसारक कासा संस्थेचे सचिव पांडुरंग बेलकर, आदिवासी विकास प्रकल्पाचे विस्तार अधिकारी अरुण शेटे, शाळेचे मुख्याध्यापक सुहास पारधी तसेच प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक डावरे आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत रणशेत, रणकोळ, उर्से आणि दाभोण अशा केंद्रातील विविध आश्रमशाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. धावणे, उंच-लांब उडी, गोळाफेक, रिले रेस अशा पारंपरिक तसेच संघभावना विकसित करणाऱ्या विविध स्पर्धांमुळे स्पर्धा रंगतदार झाल्या. विद्यार्थ्यांमध्ये उत्साह, ऊर्जा आणि क्रीडाविषयक अंगभूत कौशल्यांचे दर्शन घडवत दिवसभर खेळांचा उत्सव रंगला. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांची प्रतिभा व्यापक स्तरावर सादर करण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाचे नियोजन गंजाड आश्रम शाळेतील शिक्षक वर्गाने उत्तमरीत्या पार पाडले. स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता, शारीरिक तंदुरुस्ती आणि टीमस्पिरिटची वाढ होऊन सर्वांगीण विकासाला चालना मिळत असल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाचा समारोप विजेत्या विद्यार्थ्यांना गौरवचिन्हे आणि प्रमाणपत्रांचे वितरण करून करण्यात येणार असून, पुढील टप्प्यात जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन दिले जाणार आहे.

## जॉनी लिव्हर यांची येरवडा जेल (ओपन) उपरगृह ‘शृंखला’ ला उत्स्फूर्त भेट



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.२०, येरवडा (पुणे) :** हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय आणि बहुप्रतिभावान अभिनेते जॉनी लिव्हर यांनी आज (तारीख: वर्तमान दिवसाची तारीख) रोडा परिसरातील येरवडा जेलच्या समोरील येरवडा जेल उपरगृह ‘शृंखला’ येथे विशेष सदिच्छा भेट दिली. कैद्यांच्या पुनर्वसन प्रक्रियेतील श्रमाधारित उपक्रमांना प्रत्यक्ष अनुभवण्याचा हा उपक्रम होता.

‘शृंखला’ उपहारगृह हे येरवडा जेलचे एक महत्त्वाचे उपरगृह आहे, जिथे किचनपासून वेटरपर्यंत सर्व कामे कैदी स्वतःच्या जबाबदारीने, शिस्तबद्ध पद्धतीने करतात. पदार्थांची उत्तम गुणवत्ता आणि स्वच्छ व्यवस्थेमुळे या उपहारगृहाने परिसरात विशेष प्रतिष्ठा मिळवली आहे. जॉनी लिव्हर यांनी येथे तयार केलेले पदार्थ चाखून कैद्यांच्या मेहनतीचे, कौशल्याचे आणि मनापासून केलेल्या कामाचे मनःपूर्वक कौतुक केले. ही सकारात्मकता आणि कामाची निष्ठा कैद्यांच्या नव्या आयुष्याचा मार्ग उजळवणारी आहे, असे प्रेरणादायी उद्गार त्यांनी यावेळी काढले.

या भेटीमुळे ‘शृंखला’ उपहारगृहात काम करणाऱ्या कैद्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, ‘शृंखला’ उपरगृह केवळ एक कॅन्टीन नसून कैद्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचा आणि पुनर्वसनाचा एक आदर्श नमुना ठरत असल्याचे शेवटी अधोरेखित करण्यात आले. भेटीसअधीक्षक शमाकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी नागेश कांबळे, तसेच शृंखला उपहारगृह व्यवस्थापक पोलीस कॉन्स्टेबल अविनाश पवार, पोलीस कॉन्स्टेबल संतोष जाधव आणि उपहारगृहत काम करणारे सर्व शिक्षाधीन बंदी उपस्थित होते.